शिव छत्रपती शिक्षण संस्था संचलित

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त)

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती (EBC)

## -सूचना-

दि.०६.१०.२०२५

शै.वर्ष २०२५-२६ मधील **पदवी व पदव्युत्तर वर्गातील खुल्या (Open Category)** संवर्गातील विद्यार्थ्यांना सूचीत करण्यात येते की, चालू वर्षातील **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती (EBC)** योजनेचा ऑनलाईन फॉर्म **www.mahadbt.gov.in** या वेबसाईडवर भरून त्याची प्रिंटआऊट काढून त्यासोबत आवश्यक कागदपत्रे जोडून **दि.१७.११.२०२५** पुर्वी कार्यालयातील **खिडकी क्र. ३ व ४** मध्ये जमा करावेत. योजनेच्या नियम, अटी व फॉर्म सोबत जोडावयाच्या कागदपत्राची यादी कार्यालयाच्या समोरील नोटीस **बोर्ड क्रमांक २** वर लावण्यात आलेली आहे. संबंधीत विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.

**ई.बी.सी. फॉर्म ऑनलाईन कमी दरामध्ये भरण्याची सोय महाविद्यालयाने राजर्षी शाहू विद्यार्थी सुविधा केंद्रामध्ये करण्यात आलेली आहे.** तरी ईच्छूक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील सुविधा केंद्रावर संपर्क साधून ऑनलाईन फॉर्म भरून घेवून त्याची प्रिंट आऊट घेवून त्यासोबत आवश्यक कागदपत्रे, युजर आय.डी. व पासवर्ड सह वरील मुदतीत **खिडकी क्र. ३ व ४** मध्ये जमा करावेत.

**टीप :-**
१) **BCA III YR. & B.Voc.** या वर्गांना सदर शिष्यवृत्ती लागू नाही.
२) **सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजनेचा फॉर्म भरलेल्या विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती योजना (ई.बी.सी.) लागू नाही.**
३) **७५ टक्के किंवा त्यापेक्षा कमी हजेरी असणाऱ्या व दोन्ही सेमीस्टरचे परीक्षा फॉर्म न भरणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही व संबधीत विद्यार्थ्यांला महाविद्यालयाची पूर्ण फिस भरावी लागेल.**

प्राचार्य
PRINCIPAL
Rajarshi Shahu Mahavidyalaya, Latur
(Autonomous)

शिव छत्रपती शिक्षण संस्था संचलित

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त)

**शै.वर्ष २०२५-२६ मधील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती (EBC) योजनेसाठी लागणाऱ्या कागदपत्रांची यादी खालीलप्रमाणे आहे.**

**नवीन मंजूरीसाठी व नुतणीकरणासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची यादी.**

१) तहसिलदाराने दिलेले २०२४-२५ चे उत्पन्न प्रमाणपत्र मुळ (मर्यादा ८ लाख रु. पर्यंत) **(जर वडील ह्यात नसतील तर आईचे किंवा पालकांचे उत्पन्न प्रमाणपत्र व वडिलांचे मृत्यु प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे.)**

२) तहसिलदाराने दिलेले रहिवाशी प्रमाणपत्र / नॅशनॅलिटी प्रमाणपत्र

३) S.S.C. पासून पुढील सर्व मार्कमेमोची झेरॉक्स प्रती

४) महाविद्यालयाची प्रवेश फिस भरलेली पावती व महाविद्यालय ओळखपत्र झेरॉक्स प्रत.

५) लाभार्थी संख्याबाबत पालकाचे हमीपत्र.

६) रेशनकार्ड (शिधापत्रिका) झेरॉक्स प्रत.

७) स्वतःचे राष्ट्रीयकृत बँक पासबुक झेरॉक्स प्रत.

८) आधार कार्ड तसेच बँक खाते आधार कार्डशी लिंक केलेली पावतीची झेरॉक्स प्रत अनिवार्य आहे.

९) आधारकार्डमध्ये दुरूस्ती केलेले असेल व सुधारीत आधार कार्ड नसेल तर दुरूस्त केलेली पावती झेरॉक्स प्रत.

१०) शिष्यवृत्ती किंवा शैक्षणिक गॅप असेल तर बॉंड पेपरवर गॅप दाखवून नोटरीच्या स्वाक्षरीसह बॉंड सोबत जोडावा. **(दोन वर्षापेक्षा जास्त गॅप नसावा.)**

**नियम व अटी :-**

१) मागासवर्गीय शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना ही योजना लागू नाही.

२) महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील सिमावर्ती भागातील रहिवाशी असणाऱ्या विद्यार्थ्यांनाही या योजनेचा लाभ घेता येईल.

३) चालू वर्षातील अभ्यासक्रमासाठी पुनर्प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी या योजनेचा फॉर्म भरु नये.

४) डबल PG करणाऱ्या विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतलेला असेल तर ते विद्यार्थी सदरील योजनेचा लाभ घेण्यास पात्र नाहीत.

**५) ७५ टक्के किंवा त्यापेक्षा कमी हजेरी असणाऱ्या व दोन्ही सेमीस्टरचे परीक्षा फॉर्म न भरणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही व संबधीत विद्यार्थ्यांला महाविद्यालयाची पूर्ण फिस भरावी लागेल.**

टीप:-

**१) बी.सी.ए. तृतीय वर्ष व बी.व्होक. या वर्गांना सदर योजना लागू नाही.**

२) बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एस्सी. (सी.ए.), बी.एस्सी. (सी.एस.), बी.एस्सी. (डाटा सायन्स) & एम.एस्सी. (सी.एस.) विनाअनुदानीत तुकडीतील विद्यार्थ्यांनी फॉर्म विनाअनुदानीत (Un-Aided) म्हणूनच भरावा.

३) कागदपत्रे सूचनेमध्ये दिलेल्या यादीप्रमाणेच फॉर्मला जोडण्यात यावेत.

प्राचार्य

PRINCIPAL
Rajarshi Shahu Mahavidyalaya, Latur
(Autonomous)